लोकमत

# श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

(रजि. क्र. ए. - ७०८)

**श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे.**

## - जाहीर निविदा -

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी या न्यासाच्या वतीने खालील कामांच्या जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत

१) श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी या न्यासाच्या श्री खंडोबा मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यातील चांदी, पंचधातू व पितळ्याच्या प्राचीन/पुरातन मूर्ती व इतर तसेच न्यासाकडे जमा असलेले सोन्याचे व चांदीचे दागदागिने व मौल्यवान वस्तूंचा विमा उतरविण्याबाबत निविदा मागविण्यात येत आहे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

२) श्री मार्तंड देवसंस्थान न्यासाच्या स्वमालकीच्या पिकअप वाहनाची (निर्माल्य वाहतूक वाहन) जुनी बॉडी (हौदा) काढणे व नवीन बॉडी (हौदा) बनविणे. (प्रत्यक्ष पाहणी व माहिती घेऊन कोटेशन देणे.)

३) श्री खंडोबा मंदिर गडकोटामध्ये 'पाणी बॉटल विक्री' करण्यासाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्याबाबत. (टीप - सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ५५ हजार रुपयांपेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.

४) महाद्वार पायरी मार्गावरील हेगडी प्रधान मंदिराजवळील जागा 'ज्यूस व स्नॅक्स सेंटर' व्यवसायासाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देण्याबाबत. (टीप - सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ३५ हजार रुपयांपेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

५) दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त आकर्षक फुलांची सजावट करणे.

अ) मुख्य गाभारा सजावट करणे.

ब) मुख्य मंदिराच्या समोरील भिंतीवर तोरण (अक्षरामध्ये).

क) गडकोटामध्ये उत्तर दरवाजा जवळील कट्ट्यावर फुले/पुतळा/कटआऊट वापरून सजावट करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून कोटेशन सादर करणे.)

६) दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री खंडोबा मंदिर गडकोट सज्जास तिरंगा फेम आकर्षक विद्युत रोषणाई करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून कोटेशन सादर करणे.)

७) श्री खंडोबा मंदिराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गडकोटामध्ये अत्याधुनिक उच्च दर्जाचे नवीन DFMD मेटल डिटेक्टर मशीन ३ नग पुरविणे तसेच सद्यस्थितीला वापरात असलेले मशीन दुरुस्ती करणे.

टीप :- १) उपरोक्त काही कामांबाबत ऐच्छिक देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो. क्र. - ९३७०४५९४३३/९७६३०४४०१७)

२) इच्छुक टेंडरधारकांनी आपली निविदा व अर्ज संबंधित कामाचा अनुभव व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

**नियम व अटी :**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था / व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडते वेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु. ५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी टेंडर क्र. १ करिता आपल्या निविदा दि. २०/०७/२०२६ तसेच अ. क्र. २ ते ७ करिता आपल्या निविदा दि. २२/०७/२०२६ पर्यंत स. १० ते सायं. ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडण्याबाबत दिनांक व वेळ ई-निविदाधारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ www.khandoba.com येथे उपलब्ध आहे.

६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्याअटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

७. अ क्र. ३ व ४ करिता टेंडर फॉर्म जमा करतेवेळी अनामत रक्कम म्हणून किमान मर्यादा रकमेच्या १०% रक्कम डिमांड ड्राफ्टने देणे अनिवार्य आहे.

**-: निविदा जमा करण्याचे ठिकाण :-**

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.
'मल्हार' भक्तनिवास (दुर्गामाता चौक)
जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे.

स्वाक्षरी/-
**आशिष मारुती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.

शिक्का

स्वाक्षरी/-
**ॲड. विश्वास गोविंद पानसे**
अध्यक्ष
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी.

**।। येळकोट येळकोट जयमल्हार ।।**